महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअ‍ॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : २४४ वा | दिनांक : २४/०७/२०२५ | वार : गुरूवार

## हनी ट्रॅपमध्ये साधारण ५० मंत्री आणि अधिकारी अडकले : विजय वडेट्टीवार



**नागपूर :** महाराष्ट्रात सुरू असलेला हनीट्रॅपचा मुद्दा चांगलाच चर्चेत आहे. कॉंग्रेस नेते नाना पटोले यांनी विधिमंडळात देखील मुद्दा उपस्थित केला होता. यावर विजय वडेट्टीवार यांनी देखील मोठा दावा केला आहे. या प्रकरणात अनेक लोक अडकले आहेत, कोणत्याही पक्षाचा माणूस असो त्याच्यावर कारवाई झाली पाहिजे, असेही वडेट्टीवार यांनी म्हटले आहे.

विजय वडेट्टीवार म्हणाले, हनीट्रॅपचे खूप मोठे रॅकेट आहे. त्यात अनेक मोठे मासे अडकले आहेत. साधारण ५० तरी मंत्री आणि अधिकारी यात अडकले आहेत. हनी ट्रॅपमध्ये मोठे अधिकारी, मंत्री, राजकारणातले अनेक आजी-माजी मंत्री यामध्ये आहेत. ज्यांचे नाव पुढे आले तो लोढा याने अनेकांकडून पैसे घेतले आहेत. त्याने किमान २०० कोटींची वसूली केली असल्याचा आरोप वडेट्टीवार यांनी केला आहे. तसेच तो कोणाचा कार्यकर्ता आहे हे मी बोलणार नाही. पण या सगळ्या प्रकरणाचा खुलासा लवकर होईल. जे झाकलेले चेहरे आहेत ते समोर येतील, असेही त्यांनी म्हटले आहे.

कॉंग्रेस नेते नाना पटोले यांनी गेल्या आठवड्यात विधानसभेत मंत्रालय, नाशिक आणि ठाणे हे हनीट्रॅपचे केंद्र असल्याचा आरोप केला होता. तसेच या प्रकरणातील पेनड्राइव्ह देखील त्यांनी सभागृहात दाखवले होते. विधानसभा अध्यक्षांना हनीट्रॅपच्या मुद्द्यावर निवेदन करण्यास सांगितले, पण त्यांच्या सुचनेनंतरही सरकारने निवेदन केले नाही. ना हनी ना ट्रॅप, आमच्यापर्यंत नाना पटोलेंचे बॉम्ब पोहोचलेच नाहीत, असे सांगत मुख्यमंत्र्यांनी खिल्ली उडवली होती. आता विजय वडेट्टीवार यांनी देखील हा मुद्दा उपस्थित केला आहे.

सुरज चव्हाणने ज्या छावा कार्यकर्त्याला मारले त्याच्यावर कारवाई करताना पोलिसांना वेळ लागत आहे. सुरज चव्हाणने जे केले त्याचे मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्री समर्थन करत आहेत, असा याचा अर्थ होतो. अशा प्रकारच्या कृतीला समर्थन आहे का ते मुख्यमंत्र्यांनी सांगावे किंवा सुरज चव्हाणला अटक करावी, अशी मागणी देखील वडेट्टीवार यांनी केली आहे.

या सरकारला थोडी जरी लाज शरम असेल तर माणिकराव कोकाटेंवर कारवाई होईल. शेतकऱ्यांना आणि सरकारला भिकारी म्हणणाऱ्या, सभागृहात रमी खेळणाऱ्या माणसावर कारवाई केली जाईल. माणिकराव कोकाटेंना एक मिनिटही त्या पदावर ठेवू नये अशी आमची मागणी आहे. सरकारला शेतकऱ्यांबाबत प्रेम, कळवळा असेल तर त्यांनी त्वरित कारवाई केली पाहिजे अशीही मागणी विजय वडेट्टीवार यांनी केली. या सरकारला शेतकऱ्यांच्या भावनांशी देणं घेणं नाही, असे वक्तव्य करणाऱ्या कृषी मंत्राला पाठीशी घालणार आहे का? रमी खेळणारा मंत्री कृषी मंत्री आहे असं आम्ही सांगू का? असा संतप्त सवाल हि विजय वडेट्टीवार यांनी केलाय. कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांच्या वक्तव्यावर ते बोलत होते.

## जनसुरक्षा विधेयकावर राहुल गांधींचा विरोध : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**नागपूर :** कॉंग्रेस नेते राहुल गांधी हे अति डाव्या विचारसरणीच्या प्रभावाखाली असून त्यांच्या निर्देशामुळे कॉंग्रेस पक्ष आता महाराष्ट्रातील जन सुरक्षा विधेयकाचा विरोध करीत आहे, असा थेट आरोप मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गडचिरोली येथे माध्यमांशी बोलताना केला. राज्य सरकारने आणलेल्या जन सुरक्षा विधेयकावर सुरुवातीला कॉंग्रेसने कुठलाही आक्षेप नोंदवलेला नव्हता. विधेयक तयार करताना संयुक्त चिकित्सा समितीच्या बैठकीत प्रत्येक मुद्द्यावर सविस्तर चर्चा झाली. त्यावेळी कॉंग्रेसने सहमती दर्शवली होती. त्यामुळे विधेयक विधानमंडळात मंजूर करण्यात आले, असे फडणवीस यांनी सांगितले.

पण आता कॉंग्रेस आंदोलन करीत आहे, कारण राहुल गांधी यांनी तसे आदेश दिले आहेत, असा आरोपही फडणवीस यांनी केला. राहुल गांधी यांना अति डाव्या विचारसरणीच्या प्रभावाखाली आहे. त्यामुळे त्यांचे विचार देखील त्या दिशेने वळले आहेत. आत्ताच्या परिस्थितीमध्ये राहुल गांधी हे अति डाव्या विचारसरणीने ग्रासलेले आहे. अति डाव्या विचारसरणीच्या लोकांनी त्यांना घेरलेले आहे. त्यामुळे त्यांनी पुन्हा एकदा आदेश देताच कॉंग्रेसने राज्यात आंदोलन सुरू केल्याचे फडणवीस यांनी सांगितले.

जनसुरक्षा विधेयकात संदर्भात संयुक्त चिकित्सा समितीमध्ये सांगोपांग चर्चा करण्यात आली. त्यानंतर याचा दुरूपयोग केला जाऊ शकतो वा ते संविधान विरोधी आहे, अशी कुठलीही गोष्ट विधेयकांत नाही हे समिती सदस्यांच्याही लक्षात आले. म्हणून समितीने काही अनुषंगिक बदल सुचवले. ते आम्ही ऐकले. त्याथ्नंतर विधेयक सभागृहात पारित झाले.

गडचिरोलीत वेगवेगळ्या प्रकारचे प्रपोगंडा पसरवण्यात येत आहे. लाखो वृक्षतोड झालेली आहे, आदिवासींच्या जमिनी बळकावण्यात आल्या आहे, काही लोकांना यमसदनीही पाठवले आहे, अशा प्रकारच्या खोट्या अफवा पसरवण्यात आल्या. या अफवांचे मूळ शोधले असता काही कोलकात्याहून, काही बंगलोरमधून असल्याचे लक्षात आले. त्यामुळे भारताचा आणि महाराष्ट्राचा तसेच गोरगरीब आदीवासींचा विकास होऊ नये अशी कारस्थाने शहरी नक्षलवादी संघटना करीत आहे. पण, त्यांच्या कारस्थानाला आम्ही कृतीतून उत्तर देत आहो. लाॅयडसमध्ये लागलेल्या 14 हजार लोकांपैकी 99 टक्के दलित, आदीवासी आहे.

## सदोष-नादुरुस्त मीटर तातडीने बदला, महावितरणच्या अध्यक्षांचे निर्देश

**छत्रपती संभाजीनगर :** मराठवाड्यात वीज वितरण यंत्रणेच्या विस्तारीकरण व सक्षमीकरणाची कामे वेगाने सुरू आहेत. त्यामुळे सर्व वीज ग्राहकांना सुरळीत व दर्जेदार वीजपुरवठा देण्याच्या सेवेत कोणतीही हयगय खपवून घेतली जाणार नाही, असा इशारा महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री.लोकेश चंद्र यांनी दिला. अचूक बिलिंगसाठी नादुरुस्त व सदोष व वीज मीटर तातडीने बदलण्यात यावेत तसेच प्रत्येक महिन्याला वसुलीचे उद्दिष्ट १०० टक्के पूर्ण करावे, असे निर्देश त्यांनी बुधवारी (२३ जुलै) दिले.

लातूर येथील शासकीय विश्रामगृहात छत्रपती संभाजीनगर, नांदेड व लातूर परिमंडलातील विविध कामे व योजनांसह प्रामुख्याने मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना-२.०, मागेल त्याला सौर कृषिपंप योजनेचा श्री.लोकेश चंद्र यांनी आढावा घेतला. यावेळी सहव्यवस्थापकीय संचालक श्री.आदित्य जीवने, संचालक (संचालन/प्रकल्प) श्री.सचिन तालेवार, संचालक (मानव संसाधन) श्री.राजेंद्र पवार, कार्यकारी संचालक श्री.प्रसाद रेशमे व श्री.धनंजय औंढेकर, मुख्य अभियंता श्री.पवनकुमार कछोट (छत्रपती संभाजीनगर), श्री.अरविंद बुलबुले (लातूर), श्री. राजाराम माने (नांदेड) यांची प्रमुख उपस्थिती होती.

अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री.लोकेश चंद्र म्हणाले की, मराठवाड्यात विविध योजनांद्वारे प्रामुख्याने औद्योगिक वसाहतींसह शहरी व ग्रामीण भागात वीज वितरण यंत्रणेचे जाळे भक्कम करण्यात येत आहे. ही कामे गतिमान व दर्जेदार होतील याकडे विशेष लक्ष देण्यात यावे. सुरळीत व दर्जेदार वीजपुरवठा करणे महावितरणची जबाबदारी आहे. यामध्ये कोणतीही हयगय खपवून घेतली जाणार नाही. काही कारणांनी वीजपुरवठा खंडित झाल्यास प्रथम पर्यायी स्वरूपात तसेच दुरुस्तीचे काम युद्धपातळीवर करून खंडित विजेचा कालावधी कमीत कमी राहील याची दक्षता घ्यावी, असे त्यांनी स्पष्ट केले.

ते पुढे म्हणाले की, महावितरणचे अस्तित्व हे वीजबिलांच्या महसुलावरच अवलंबून आहे. गेल्या तीन-चार महिन्यांमध्ये महसुलाच्या उद्दिष्टाप्रमाणे बिलांची वसुली झालेली नाही, ही गंभीर बाब आहे. महावितरणच्या आर्थिक स्थैर्यासाठी वीजबिल वसुलीशिवाय अन्य पर्याय नाही. थकबाकी व चालू वीजबिलांचे उद्दिष्ट दरमहा पूर्ण करावे. तसेच जुन्या नादुरुस्त किंवा सदोष वीजमीटरमुळे महावितरण व ग्राहकांना आर्थिक फटका बसतो. असे जुने मीटर तातडीने बदलण्यात यावेत.

घरगुती ग्राहकांचे वीजबिल शून्यवत करणारी प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजना, शेतकऱ्यांना दिवसा वीजपुरवठा करण्यासाठी मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना, मागेल त्याला सौर कृषिपंप आदी योजनांची प्रभावी अंमलबजावणी करणे व ग्राहकांना लाभ मिळवून देणे, हे महावितरणमधील प्रत्येकाचे कर्तव्य आहे. प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेद्वारे सौरग्राम योजनेला मोठे पाठबळ मिळत आहे. स्थानिक लोकप्रतिनिधी व ग्रामस्थांच्या सहकार्याने या योजनेला आणखी गती द्यावी. स्वातंत्र्य दिनाच्या ग्रामसभांमध्ये या योजनेची माहिती द्यावी. गावागावांमध्ये प्रबोधन करावे, अशी सूचना श्री.लोकेश चंद्र यांनी केली.



महाराष्ट्र जनशक्ती
website: www.maharashtrajanshaktinews.com
छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार २४ जुलै २०२५

# लोकमान्य टिळकांचे सार्वजनिक विचार आत्मसात करा : प्राचार्य केशव भांगे



**शिरूर (का.)** : दि.२३ जुलै २०२५ बुधवार रोजी, शिरूर (कासार) जि.बीड येथील कालिकादेवी माध्यमिक विद्यालयात, 'लोकमान्य बाळ गंगाधर टिळक' यांची जयंती मोठ्या' उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष तथा प्राचार्य सन्माननीय केशव भांगे साहेब यांच्या हस्ते,'लोकमान्य बाळ गंगाधर टिळक' यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले.या प्रसंगी प्राचार्य केशव भांगे साहेबांनी अध्यक्षीय भाषणातून,'लोकमान्य टिळक हे थोर स्वातंत्र्यसैनिक, शिक्षक व पत्रकार होते.

त्यांची विचारसरणी जहालमतवादी होती. म्हणूनच त्यांनी भारताच्या स्वातंत्र्यासाठी ब्रिटिशांच्या विरोधात दंड थोपटले व 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे,आणि तो मी मिळविणारचं',अशी सिंव्हगर्जना केली.तसेच 'केसरी' व 'मराठा' वृत्तपत्राच्या माध्यमातून लोकांमध्ये राष्ट्रीयत्वाची भावना निर्माण केली.आणि गणेशोत्सव व शिवजयंती हे उत्सव साजरे करून आपणास सार्वजनिक विचार शिकविला.

हाच लोकमान्य टिळकांचा सार्वजनिक विचार विद्यार्थी व शिक्षकांनी आत्मसात करावा.असे अभ्यासपूर्ण विचार अध्यक्षीय भाषणातून मांडले.यावेळी उपप्राचार्य प्रा.बसवेश्वर देशमाने यांनी प्रास्ताविकपर भाषणातून लोकमान्य टिळकांचे भारतीय स्वातंत्र्यासाठीचे योगदान मोठे होते.या विषयी माहिती सांगितली.तर सांस्कृतिक विभाग प्रमुख डाॅ.आत्माराम झिंजुर्डे,व विद्यार्थी प्रतिनिधी चि.शोयब आतार यांनी मनोगतं व्यक्त केले.

त्यानंंतर कालिकादेवी विद्यालयाने राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शनात सहभागी होण्यासाठीचा मान मिळविला.त्या बद्दल चि.शोयब आतार आणि विज्ञान शिक्षक,श्री आबासाहेब ढवळे यांचा विद्यालयाच्या वतीने, प्राचार्य केशव भांगे साहेबांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

यावेळी उपप्राचार्य बसवेश्वर देशमाने,उपमुख्याद्यापक प्रकाश राठोड,पर्यवेक्षक जनार्दन काळे, विज्ञान विभाग प्रमुख, प्रा.संजय काकडे, परीक्षा विभाग प्रमुख प्रा.नामदेव तरकसे, प्रा.अशोक इनकर, प्रा.प्रशांत मळेकर, प्रा.अनिल जरे, प्रा.संजय आव्हाड, प्रा.नारायण घोलप, प्रा.बिभिषण घायाळ, प्रा.विश्वास ढाकणे, प्रा.महादेव हांगे,प्रा.दत्ता गायकवाड, प्रा.घनश्याम चव्हाण, प्रा.लक्ष्मण गव्हाणे,प्रा.दत्ता शिंदे, डॉ.सत्यनारायण ढवळे, डॉ.अशोक घोडके, प्रा,अशोक सवासे, प्रा.सुनिल मोरे, प्रा.शशिकांत जावळे,प्रा.हनुमंत घायाळ, प्रा.बाळासाहेब खटाणे, प्रा.अक्षय रणखांब, प्रा.अमर खोले, प्रा.सविता दराडे, प्रा.रेखा निर्मळ प्रा.सिमा ढवळे, श्रीमती अनिता लाटे मॅडम, आबासाहेब ढवळे, रविंद्र बडे, बाळासाहेब येवले, वसंत आहेर,राजू बडे, जयेंद्र निकम, आप्पासाहेब कांबळे, नितीन बहिर, रोहित शिराळे, प्रशांत राऊत, रविंद्र गव्हाणे, सुंदर शिंदे, अक्षय साळवे, जितेश उगलमुगले, आदिनाथ काशिद, सुनिल खेडकर, विलास कांबळे, गौतम भोसले, इत्यादिंची उपस्थिती होती.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.विनोद गलांडे यांनी केले,तर आभार प्रदर्शन प्रा.नारायण तांबे यांनी केले.विद्यालयातील सर्व कनिष्ठ प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सावता महाराज प्रतिमेची मिरवणूक काढण्यात आली



**दौलताबाद (जावेद अहेमद)** : माळीवाडा येथे अखंड हरिनाम सप्ताह व सामुहिक संत सावता महाराज चरित्र पारायण सोहळा सावता महाराज मूर्ती अभिषेक, पुण्यतिथी सोहळा दरवर्षीप्रमाणे याही वर्षी श्रीक्षेत्र देवगिरी पंचकोशातील जनार्दन स्वामी ,सावता महाराज श्रीक्षेत्र देवगिरी पंचकोशातील माळीवाडा येथील सावता महाराज मंदिर येथे अखंड हरिनाम सप्ताह व सामुहिक संत सावता महाराज चरित्र पारायण सोहळ्याचे आयोजन दि.१६ जुलै ते बुधवार, दि. २३ जुलै रोजी सकाळी गावातुन सावता महाराज प्रतिमेची मिरवणूक काढण्यात आली.

यावेळी संपुर्ण गल्लीत रागोळी टाकून मिरवणूकीत महिलानी फुगडी, टाळ वाजत गाजझत संपुर्ण गावातुन मिरवणूक हि सावता महारात मंदिर जवळ संपन्न झाली. ह.भ.प.एकनाथ महाराज कव्हर पैठण यांचे काल्याचे कीर्तन व ह.भ.प.सौरभ महाराज कुलकर्णी यांच्या हस्ते दहीहंडी फोडुन नंतर महाप्रसादाने सागता करण्यात आली.

या कार्यक्रमाची व्यवस्था चंद्रकांत हेकडे,आसाराम हेकडे यमनाथ मुळे सुधाकर हेकडे नारायन मुळे गंगाधर मुळे, गाजरे कारभारी शिवाजी मुळे वैजिनाथ हेकडे कृष्णा गजानन मुळे रावसाहेब शेरकर शिवाजी भगत धोडीराम जगधने अनिल भगत यानी पाहिली यावेळी ग्रामस्थांची संख्या मोठी होती महिला व मुले मोठा संख्येने उपस्थिती होता.






महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार २४ जुलै २०२५

# जे ई एस महाविद्यालय लोकमान्य टिळक यांची जयंती साजरी



**जालना (प्रा. राजेंद्र सोनवणे) :** जे ई एस महाविद्यालय जालना येथे राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे स्वर्गीय लोकमान्य टिळक यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी उपप्राचार्य प्रा. प्रवीण बाफना, पर्यवेक्षक डॉ. सुमंत बिक्कड राष्ट्रीय सेवा योजनेचे विभागीय समन्वयक प्रा.डॉ. राजेंद्र सोनवणे. मुक्त विद्यापीठाचे केंद्र समन्वयक डॉ. शेवाळे,प्रा. अनिल घातरे आदि उपस्थित होते




# आयुष्याच्या परीक्षेतही गुणवंत व्हा : माजी आमदार लक्ष्मणराव मनाळ



**करमाड (प्रतिनिधी) :** येथील राजीव गांधी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात दि. २१ जुलै २०२५ रोजी गुणवंत विद्यार्थी सत्कार सोहळा व पालक मेळावा आयोजीत करण्यात आला. या सोहळ्याचा अध्यक्षीय समारोप करतांना संस्था अध्यक्ष मा. आ. लक्ष्मणराव मनाळ यांनी विविध क्षेत्रात महाविद्यालयाचे नाव उज्वल करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचे कौतुक करुन त्यांना यापुढे आयुष्याच्या परीक्षेतही गुणवंत व्हा असा संदेश दिला. महाविद्यालयाचा विद्यार्थी ओम काकड (सी.ए.), सिद्धेश्वर आवारे, शुभांगी पोफळे, स्नेहल जैन, वैष्णवी शिंदे सर्वांनी (सी.एम.ए.) परीक्षेत यश मिळविले. महेश दिवटे, पल्लवी डक अनुक्रमे राज्यशास्त्र व इतिहासात नेट, सेट उत्तीर्ण झाले. जोनवाल योगेश पी. एस. आय झाला. नंदकिशोर इंगळे (एम.पी.एस.सी) द्वारे आरोग्य सेवेत रुजू झाला. अनेक विद्यार्थी पोलीस, शिक्षक म्हणून निवडले गेले. तसेच १२ वी विज्ञान शाखेमध्ये शेरे अदित्य रतन, वैद्य वेदान्त किशोर, धनेधर मृण्मयी सचीन व कला शाखेतील बनकर अश्विनी विजय, भोसले गीता हरिभाऊ या गुणवंत विद्यार्थ्यांना शाल व सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच विद्यार्थीनींसाठी सखी सावित्री समितीची स्थापना करण्यात आली.महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सदाशिव मुळे यांनी प्रास्तविक सादर करतांना महाविद्यालयात राबविले जाणारे उपक्रम व विद्यार्थ्यांचा सहभाग स्पष्ट केला. संस्था सचिव श्रीमती डॉ. शैलजा जोशी या प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होत्या, करमाड येथील जेष्ठ नेते सय्यद जमीर भाई व श्री. भाऊराव मुळे यांनी गुणवंत विद्यार्थ्यांचे कौतुक करतांना आपले मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी मंचावर सरपंच प्रमिलाताई मुळे, माजी सरपंच कृष्णा उकिर्ड, माजी सरपंच श्री कैलास उकिर्डे, तंटामुक्तीचे अध्यक्ष पुडलिक दादा उकिर्डे, श्री. भगवानराव मुळे उपस्थित होत. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन उपप्राचार्य व संयोजन समिती प्रमुख प्रा मनोज देवकर यांनी केले. तर आभार प्रा. डॉ. जयश्री पाटील यांनी मानले.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्राचार्य, उपप्राचार्य यांच्या मार्गदर्शनाखाली प्रा.डॉ. कालिदास फड, डॉ. प्रविण मस्के, डॉ. रमेश कचरे, डॉ. सुखदेव पोटदुखे, डॉ. सौरभ चव्हाण, डॉ. ललित गोल्डे, प्रा. प्रशांत माटे, प्रा. अर्जुन चव्हाण, प्रा हरिदास होळकर, डॉ. किशोर काळे, डॉ. नानासाहेब लावंड, श्री भगवंत देशपांडे, श्री. कैलास जाधव, श्रीमती सुनिता पारेकर, श्री. मधुकर राठोड आदिनी परिश्रम घेतले. यावेळी प्रा.डॉ. बाळासाहेब लिहिणार, प्रा.डॉ. अश्विनीकुमार चिंचोलीकर, प्रा. डॉ. लक्ष्मण दांडगे यांच्यासह मोठ्या संख्येने विद्यार्थी व पालक उपस्थित होते.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार २४ जुलै २०२५


## बद्रीनारायणजी बारवाले यांच्या स्मृतिदिनानिमित्त विशेष व्याख्यान



**जालना :** पद्मभूषण बद्रीनारायण बारवाले यांच्या स्मृतिदिनाच्या निमित्ताने महाविद्यालयात तीन दिवस विविध उपक्रम हाती घेतले जाणार आहे. आज प्रा. राजक्रांती वलसे यांनी बद्रीनारायण बारवाले यांचे कृषी क्षेत्रातील योगदान याविषयी मार्गदर्शन केले.

श्री. बारवाले यांनी शिक्षण, आरोग्य, शेती या क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान दिले. परिश्रमाच्या जोरावर त्यांनी विविध क्षेत्रात नाव कमावले. विद्यार्थ्यांनीही त्यांना आदर्श मानून आपले नाव उज्वल करावे. असे ते म्हणाले.

प्रा. आशा पांडे यांनीही प्रासंगिक विचार व्यक्त केले. आयोजित रांगोळी स्पर्धेबरोबरच व्यक्तिमत्व विकासाच्या विविध स्पर्धा घेण्यात येणार आहेयावेळी प्राचार्या डॉ. कविता प्राशर, डॉ. चंद्रकांत धोत्रे, प्रा.रूपाली तिडके, डॉ. मंगल मुळे, प्रा. पूनम गोळे यांच्यासह विद्यार्थी उपस्थित होते. सूत्रसंचालन व आभार प्रा. प्रमोद अवचार यांनी मानले.







## शाळेच्या सर्वांगीण विकासासाठी नवीन समिती कटिबद्ध : सरपंच अशोक दाबके



**कन्नड (अरुण थोरात):** तालुक्यातील अंधानेर येथील जिल्हा परिषद प्रशालेच्या शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदी विलासराव आहेर तर उपाध्यक्षपदी कनिजा शेख यांची सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आली.दि.२२ जुले रोजी प्रशालेत पार पडलेल्या समितीच्या बैठकीत ही निवड खेळीमेळीच्या वातावरणात शांततेत पार पडली. यावेळी सरपंच अशोकराव दाबके, मुख्याध्यापक राजीव जाधव, ग्रामविस्तार अधिकारी माणिकराव पगारे, मावळते अध्यक्ष गोरखभाऊ करवंदे यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रस्ताविक संजय केवट यांनी केले.शालेय व्यवस्थापन समिती ही शाळा, पालक, ग्रामपंचायत व शिक्षण विभाग यांच्यातील दुवा म्हणून काम करते. विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण, पायाभूत सुविधा, शिक्षकांची उपलब्धता, शिस्त आणि विविध उपक्रमांचे आयोजन या बाबींमध्ये समिती सक्रिय सहभाग घेते. ही समिती शाळेच्या निर्णय प्रक्रियेतील एक महत्त्वाचा भाग असून, पालकांचा सहभाग निश्चित करणारी एक प्रभावी यंत्रणा आहे.यावेळी सरपंच अशोकराव दाबके यांनी नवनिर्वाचित अध्यक्ष व उपाध्यक्ष यांचे अभिनंदन करताना सांगितले की, “शाळा ही गावाचा आत्मा आहे. विद्यार्थ्यांचे भवितव्य घडवण्यासाठी ही समिती महत्त्वाची आहे.

नवीन समितीकडून आम्हाला सकारात्मक बदलांची अपेक्षा आहे. ग्रामपंचायतीच्या माध्यमातून शाळेसाठी जे काही शक्य होईल ते सर्वतोपरी सहकार्य आम्ही करू.”मुख्याध्यापक राजीव जाधव यांनी नवीन समितीला शुभेच्छा देताना सांगितले की, “गेल्या काही वर्षांत प्रशालेने शैक्षणिक, सांस्कृतिक व क्रीडा क्षेत्रात चांगली प्रगती केली आहे. पालकांचे सहकार्य मिळाल्यास ही प्रगती पुढे नेणे शक्य आहे.”मावळते अध्यक्ष गोरखभाऊ करवंदे यांनी आपल्या कार्यकाळातील अनुभव सांगून नवीन समितीला मार्गदर्शन केले.

या समितीत सदस्य म्हणून बाळू सोनवणे, अझहर बागवान, वैशाली लोखंडे, उषा सोनवणे, अशोक सोनवणे, सोनाली सातदिवे, मिलिंद गायकवाड, फिरोज पठाण, दत्तू गायकवाड, कल्पना बावस्कर, सरला नेवगे यांचा समावेश आहे. सर्व नवनियुक्त सदस्यांचा मान्यवरांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. समारोपाला ग्रामविस्तार अधिकारी माणिकराव पगारे यांनी शाळेच्या विकासासाठी शासनाच्या विविध योजनांची माहिती देत सहकार्याची ग्वाही दिली. सूत्रसंचालन संजय केवट यांनी केले तर आभार रामभाऊ गुढेकर यांनी मानले.

महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), गुरूवार २४ जुलै २०२५

# फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलची १२२ वी वैचारीक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळा संपन्न









लोकशाही जिवंत राहिली तर तिची फळे नक्कीच लाभतील, पण लोकशाही मेली तर विनाश अटळ आहे. __ डॉ. बाबासाहेब आंबेडकरफुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलची १२२ वी वैचारीक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळा संपन्न. छत्रपती संभाजी नगर (प्रतिनिधी) : फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलच्या वतीने फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलचे जनसंपर्क कार्यालय ४, साकेत नगर, छत्रपती संभाजी नगर येथे "लोकशाही जिवंत राहिली तर तिची फळे नक्कीच लाभतील, पण लोकशाही मेली तर विनाश अटळ आहे." या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विधानाचा८३ वा वर्धापन दिन, अण्णाभाऊ साठे स्मृतिदिन व भारतरत्न नेल्सन मंडेला यांच्या जयंतीनिमित्त १२२ व्या वैचारीक प्रबोधनात्मक साप्ताहीक कार्यशाळा २० जुलै २०२५ ला आयोजित करण्यात आली होती.

फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलचे संचालक बी. बी. मेश्राम अध्यक्षीय मार्गदर्शन करताना म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सर स्ट्रॅफोर्ड क्रिप्स समोर स्वतंत्र मजूर पक्षाच्या वतीने बहिष्कृत वर्गाच्या अनुषंगाने समस्या मांडल्यावर त्यांनी मजूर पक्षाच्या वतीने ते मांडता येणार नाही. त्यासाठी तशा वर्गाच्या एखाद्या संघटनेमार्फत मांडलेले योग्य राहील, असे मत व्यक्त केले होते. त्यामुळे निर्माण झालेल्या तत्कालीन परिस्थितीत बहिष्कृत वर्गाच्या नवीन संघटनेच्या निर्माण कार्यासाठी अधिवेशन बोलावणे भाग पडले होते. त्यामुळे १८ ते २० जुलै १९४२ ला नागपूर येथील मोहन पार्क येथे अधिवेशनाचे आयोजन करण्यात आले होते. संबंधित परिषदेचे अध्यक्ष म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची पूर्वीच निवड झाली होती. परंतु ९ जुलै १९४२ च्या व्हाईसरॉयच्या हुकूमान्वये मंत्रिमंडळात समावेश झाल्याने त्यांना अध्यक्षस्थान भूषविता आले नाही. ज्यात मद्रास लॉ कॉलेजचे प्रोफेसर एम एल ए एन शिवराज यांच्या अध्यक्षतेखाली अखिल भारतीय दलित वर्ग परिषद, अमरावती येथील सुलोचनाताई डोंगरे यांच्या अध्यक्षतेखाली अखिल भारतीय महिला दलित वर्ग परिषद व पंजाबचे एच बी ई एमएलए गोपाळ सिंह यांच्या अध्यक्षतेखाली समता सैनिक दलाची परिषद आयोजित करण्यात आली होती. या परिषदेत क्रिप्स योजना अस्पृश्यांना मान्य नाही, घटना परिषद लवकर भरविण्यात यावी, अस्पृश्याच्या संरक्षणासाठी अर्थसंकल्पात तरतूद करण्यात यावी. अस्पृश्यांना सरकारी जमिनी देऊन निवासी वसाहती निर्माण कराव्यात. दि ऑल इंडिया शेड्युल्ड कास्ट फेडरेशनला मध्यवर्ती राजकीय पक्ष म्हणून मान्यता देण्यात यावी. असे ठराव संमत करण्यात आले होते.

स्ट्रॅफोर्ड क्रिप्स मिशनच्या अहवालावर बोलताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते की, अखिल भारतीय अनुसूचित जातीतर्फे सर्वमान्य व सुसंघटित अशी चळवळ करणे आवश्यक असून ज्या अंतर्गत ही सार्वत्रिक चळवळच राजकीय विनाशापासून वाचवू शकेल. अस्पृश्य लोक हे हिंदूचा एक विभाग अथवा उपविभाग उपविभाग नसून भारताच्या राष्ट्रीय जीवनातील तो एक स्वतंत्र आणि ठळक घटक आहे. हा सिद्धांत त्यांच्या राजकारणाचा पाया अर्थात गुरुकिल्ली असल्याचे स्पष्ट केले होते. तसेच जर लोकशाही जिवंत राहिली तर तिची फळे नक्कीच आपणास लाभतील. मात्र लोकशाही मेली तर आपला विनाश अटळ आहे. याची जाणीव करून दिली होती. डॉ. आंबेडकरांनी दलित वर्गाच्या सामाजिक, आर्थिक व राजकीय उत्थानासाठी स्वाभिमानी चळवळ चालवल्यामुळे जनतेने त्यांना भावपूर्वक मानपत्र अर्पण केले होते. त्यावर उत्तर देताना डॉ. आंबेडकरांनी शिक्षित व्हा, चळवळ करा (लढा उभारा), संघटित व्हा, आत्मविश्वास बाळगा आणि कधीही धीर सोडू नका. असा पंचसुत्री सल्ला दिला होता. तसेच महिला परिषदेत बोलताना स्त्रियांची प्रगती ज्या प्रमाणात झाली असेल त्यावरून एखाद्या समाजाची प्रगती मी मोजत असतो. असे स्पष्ट केले होते. सदरील परिषदेला २० हजार महिला, ५० हजार पुरुष व ५ हजार समता सैनिक दलाचे सदस्य शिस्तीत उपस्थित होते. या सर्व बाबीचा विचार करून ऐतिहासिक पार्श्वभूमी लक्षात घेता सदरील विषयावर कार्यशाळेच्या माध्यमातून प्रासंगिक सविस्तर चर्चा करीत आहोत. विस्ताराने समजून घेण्यासाठी या विषयावर लिहिलेला सविस्तर लेख दै. प्रबुद्ध भारत, दै. तुफान क्रांती, दै. निळे प्रतीक, दै. महावृत्त, दै. घटनेचा शिल्पकार, विचार क्रांती न्यूज पोर्टल यांनी आज प्रकाशित केला आहे. ते आपण समजून घ्यावे.

उद्घाटन पर मार्गदर्शन करताना एड. जयश्री निकम सोनवणे म्हणाल्या की, जिथे मतदारांचा आवाज हा सत्ताधाऱ्यांपेक्षा जास्त असतो त्यालाच लोकशाही म्हटले पाहिजे. माध्यमांनी आपली भूमिका निष्पक्षपणे पार पाडली पाहिजे. लोकशाही जिवंत ठेवण्यासाठी केवळ उद्योगपती, राजकारणी व व्यापारी एकत्र आल्यास शक्य होणार नाही. त्याकरिता समाज जीवनातील सामान्य जनतेला सामावून घ्यावे लागेल. जिथे लोकशाहीत प्रश्न विचारणे, सत्य बोलणे हे देशद्रोह ठरेल तिथे लोकशाही जिवंत कशी काय राहील? करिता महिलांची साक्षरता वाढवून सक्षमीकरण केलं पाहिजे जेणेकरून चळवळीत त्यांचा सहभाग वाढेल.

प्रमुख वक्ते म्हणून मार्गदर्शन करताना इंजिनीयर किशोर पाटील म्हणाले की, फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलच्या विचारमंचामुळे व्यक्त होण्याची संधी प्राप्त झाली आहे. याचा लाभ अर्धांगिनी स्मिता किशोर पाटील यांनाही व्हावा म्हणून मी आज त्यांना कार्यशाळेला घेऊन आलो आहे. अर्थात घरातील भाषणच तुमच्या समोर उभे केले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आयोजित केलेल्या सदरील सभेला २० हजार महिला उपस्थित होत्या. आजच्या परिस्थितीत चळवळीसाठी २० महिला सुद्धा एकत्र येत नाहीत. आज केवळ दोन महिला उपस्थित आहेत. ही शोकांतिकाच नव्हे काय? महिलांचा सहभाग वाढला तर येणाऱ्या पिढीवर चांगले संस्कार होण्याची शक्यता आहे. उच्च ध्येय साध्य करण्यासाठी महत्त्वाकांक्षी असले पाहिजे. कुटुंबापुरते जीवन जगणे हे शेणातल्या किड्याप्रमाणे जीवन जगण्यासारखे आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना मानणारा समाज प्रगतीकडे वाटचाल करीत असतो. याचे भान ठेवून आपण मार्गक्रमण केले पाहिजे. नाकर्तेपणा हा दैववादाचा पाया आहे. म्हणून आपण कर्मवाद स्वीकारला पाहिजे आणि सत्कर्म करीत राहिले पाहिजे.

याप्रसंगी राहुल मेश्राम म्हणाले की, भारताचे संविधानाची काटेकोरपणे अंमलबजावणी करणे म्हणजे लोकशाही होय. प्रतीक पंचशील म्हणाले की, भारताचे संविधान लागू होऊन ७५ वर्षे झालीत तरी मात्र अपेक्षेप्रमाणे बदल होताना दिसत नाही. ज्या लोकांना लोकशाहीचा फायदा मिळाला आहे ते टिकविण्यासाठी प्रयत्नशील आहेत. तर इतर जन मात्र समाप्त करण्याच्या प्रयत्नात आहेत. करिता आपण लोकशाही मूल्याच्या संवर्धनासाठी कार्यरत राहिले पाहिजे. ॲड. विशाल अवचार म्हणाले की, विषय लोकशाहीच्या संबंधाने असल्यामुळे सत्तेवर येणारी माणसं त्यांच्या जाहीरनाम्यात काय लिहीत असतात? याची आपण तपासणी केली पाहिजे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी समग्र मानवी समाजासाठी भारताचे संविधान लिहिलेले असताना अज्ञानापोटी अनेक मंडळी त्यांना दलितांचे उद्धारकर्ते, पुढारी असे म्हणतात. आज लोकशाही हा मुद्दा आपल्या देशापुरता मर्यादित राहिलेला नसून तो जागतिक झालेला आहे. महिला आधुनिकीकरणाकडे वळत असल्या तरी समाजकारणाचे काय? करिता त्यांनी समोर येऊन समाजात समाजवाद रुजवीला पाहिजे. एड. सचिन आगरकर म्हणाले की, एक स्त्री शिकली तर घर पुढे नेऊ शकते, म्हणून मुलींना शिक्षण दिले पाहिजे. स्मिता किशोर पाटील म्हणाल्या की, वीस वर्षापासून किशोर पाटील साहेब आपल्या विचारावर ठाम आहेत. आता मात्र त्यांना फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कलच्या वतीने एक मंच मिळाला आहे.

सुरुवातीला आदर्शांना मान्यवरांच्या हस्ते पुष्पमाला अर्पण करण्यात आल्या तर स्टडी सर्कलच्या वतीने मान्यवरांचे व उपस्थित प्रतिनिधींचे स्वागत करण्यात आले. कार्यशाळेचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक एड. विलास रामटेके यांनी तर आभार साधू आनंद यांनी व्यक्त केले. यावेळी कार्यशाळेला एड. विलास रामटेके, बी. बी. मेश्राम, एड. इंजिनीयर किशोर पाटील, प्रतीक पंचशील, एड. जयश्री निकम सोनवणे, साधू आनंद, एड. विशाल अवचार, एड. सचिन आगरकर, राहुल मेश्राम, अशोक मेश्राम इत्यादी प्रतिनिधी उपस्थित होते.

**शब्दांकन : बी. बी. मेश्राम,**
संचालक : फुले शाहू आंबेडकराईट स्टडी सर्कल, छत्रपती संभाजी नगर, महाराष्ट्र.
संपर्क : ८९८३०८२१२८ (Wh), ९४२१६७८६२८
(C)
circumference1968@gmail.com

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002